# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २८.०२.२०२०**

## जिल्हा : सांगली

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२९.०२.२०२० ते ०४.०३.२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | २९ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३३ | ३३ | ३४ | ३३ | ३२ |
| किमान तापमान (अं.से.) | २१ | २१ | २० | १९ | १८ |
| ढग स्थिती (आकाश) | ३ | ३ | ४ | ३ | ३ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ४८ | ४३ | ४३ | ४६ | ५० |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | २६ | २८ | २८ | २७ | २६ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ६ | १० | ६ | ८ |
| वाऱ्याची दिशा | पश्चिम.नैऋत्य | दक्षिण | दक्षिण | पूर्व.आग्नेय | पश्चिम.ईशान्य |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश/ इशारा** | | भारतीय हवामानशास्त्र विभाग पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार सांगली जिल्ह्यात दिनांक ०४ मार्च पर्यंत आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. तापमान ३२.० ते ३४.० अंश सेल्सिअस दरम्यान तर किमान तापमान १८.० ते २१.० अंश सेल्सिअस दरम्यान राहील. वाऱ्याचा वेग ताशी ०६ ते १० कि.मी. राहील. |
| **सामान्य सल्ला** | | ➢ पक्व झालेल्या पिकांची काढणी करून घ्यावी तसेच काढणी केलेल्या शेतीमालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **संदेश** | | ➢ सांगली जिल्ह्यात दिनांक ०४ मार्च पर्यंत आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. |
| **गहू** | पक्वता | ➢ गहू पिकाची कापणी पिक पक्व होण्याच्या २-३ दिवस आधी करावी त्यामुळे गव्हाचे दाने शेतात झडण्याचा प्रकार आढळत नाही. कापणीच्या वेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ % असावे. |
| **रब्बी ज्वारी** | पक्वता | ➢ पक्व झालेल्या ज्वारी पिकाची काढणी करावी. काढणी केलेली कणसे उन्हात वाळवावीत व नंतर मळणी करावी. साठवणुकी पूर्वी ज्वारीचे धान्य उन्हात वाळवावे व साठवणूक करावी. |
| **हरभरा** | पक्वता | ➢ बागायती हरभऱ्याच्या विविध वाणांची पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी. |
| **भुईमुग** | अंकुरन्या नंतरची | ➢ भुईमुग पिक पेरणीनंतर ४० दिवंसापर्यंत तण विरहीत ठेवावे त्यासाठी वेळोवेळी कोळपणी व खुरपणी करावी.<br>➢ उन्हाळी भुईमुगास जमिनीच्या मगदूमाप्रमाणे ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. |
| **ऊस** | वाढीची | ➢ ऊस खोडवा व्यवस्थापनाकरिता उस तोडणी झाल्यानंतर शेतात उरलेले उसाचे पाचट जाळू नये. किड, रोग व तणग्रस्त लागण क्षेत्र असल्यास खोडवा ठेऊ नये. खोडवा उसामध्ये गवताळ वाढीची बेटे दिसून आल्यास त्वरित काढून नष्ट करावीत.<br>➢ पूर्व हंगामी लागवड केलेल्या उस पिकाच्या लागणीस १२ ते १६ आठवडे झाले असल्यास नत्र खताचा तिसरा हप्ता ३४ किलो नत्र (७४ किलो युरिया) द्यावा. |
| **कांदा** | वाढीची | ➢ रांगडा हंगामातील कांदा काढणीस तयार झाला असल्यास तीन आठवडे आधी कांद्याचे पाणी बंद करावे. |
| **वांगी** | लागवड | ➢ उन्हाळी हंगामामध्ये वांग्याची लागवड फेब्रुवारी ते मार्च महिन्यात पूर्ण करावी. लागवडीसाठी मांजरी गोटा, फुले हरित, कृष्णा (संकरीत), फुले अर्जुन (संकरीत) या वाणांची निवड करावी. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**

| | | |
|---|---|---|
| **मिरची** | वाढीची | ➢ फळकुज व शेंडेमर या रोगांच्या नियंत्रणासाठी टेबुकोण्याझोल हे बुरशीनाशक १०मि.ली प्रती १० ली. पाण्यात मिसळून फवारावे. |
| **काजू** | मोहर अवस्था | ➢ काजूवर ढेकण्या (टी मॉसकिटो) किडीचा प्रादुर्भाव झाल्यास लॅमडा सायहॅलोथ्रीन ५ % प्रवाही ६ मि.ली. प्रती १० ली. पाण्यात मिसळून पालवी फुटण्याच्या वेळी फवारणी करावी. |
| **आंबा** | मोहर | ➢ करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी पिक फुलोऱ्यात असताना कार्बेन्डॅझिम १२%+मॅन्कोझेब ६३% डब्ल्यू.पी. (२०ग्रॅम/ १० लिटर पाणी) या संयुक्त बुरशीनाशकाच्या दहा दिवसांच्या अंतराने दोन फवारण्या घ्याव्यात. |
| **जनावरे** | वाढीची | ➢ जनावरांच्या चाऱ्यासाठी संकरीत नेपियर गवताची लागवड करावी त्यासाठी फुले जयवंत व फुले गुणवंत या वाणांचा वापर करावा. |

स्त्रोत
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर

ठिकाण : कोल्हापूर
दि. : २८.०२.२०२०

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**